# ४. आर्थिक विकास

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.**

**(१) १९ जुलै १९६९ साली देशातील प्रमुख........ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.**
(अ) १२
**(ब) १४**
(क) १६
(ड) १८

**(२) वीस कलमी कार्यक्रमाची......यांनी घोषणा केली.**
(अ) पं.नेहरू
(ब) लालबहादूर शास्त्री
**(क) इंदिरा गांधी**
(ड) पी.व्ही.नरसिंहराव

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा व लिहा.**

| व्यक्ती | कार्य |
|---|---|
| (१) कावसजी दावर | पोलादाचा कारखाना |
| (२) डॉ.दत्ता सामंत | गिरणी कामगारांचे नेतृत्व |
| (३) ना.मे.लोखंडे | गिरणी कामगारांना सुट्टी |
| (४) नारायण सुर्वे | कवितांद्वारे श्रमिकांच्या जीवनाचे दर्शन |

**उत्तर:**
**चुकीची जोडी:** कावसजी दावर-पोलादाचा कारखाना.
**दुरुस्त केलेली योग्य जोडी:** कावसजी दावर-पहिली कापड गिरणी.

**२. (अ) तक्ता पूर्ण करा.**
**उत्तर:**

| पंचवार्षिक योजना | कालावधी इ.स. | उद्दिष्टे |
|---|---|---|
| पहिली | **१९५१-१९५६** | शेती, सामाजिक विकास |
| दुसरी | १९५६-१९६१ | औद्योगिकीकरण |
| तिसरी | **१९६१-१९६६** | विषमतेचे निर्मूलन, रोजगारसंधी विस्तार, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ |

| | | |
|---|---|---|
| **चौथी** | १९६९-१९७४ | शास्त्रीय संशोधन, आरोग्य व कुटुंबनियोजन |
| पाचवी | **१९७४-१९७९** | **दारिद्र्यनिर्मूलन, देश आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे** |

**(ब) संकल्पना स्पष्ट करा.**

**(१) मिश्र अर्थव्यवस्था**

**उत्तर:** (१) ज्या अर्थव्यवस्थेत काही उद्योग खासगी उदयोजकांच्या मालकीचे असतात, तर काही सरकारी मालकीचे असतात; अशा अर्थव्यवस्थेस 'मिश्र अर्थव्यवस्था ' असे म्हणतात.
(२) मिश्र अर्थव्यवस्थेत भांडवलशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्थांतील चांगले गुण एकत्र आणण्याचा प्रयत्न केलेला असतो.
(३) या अर्थव्यवस्थेत उद्योगातील नफ्याची प्रेरणा, नियमपालन, कालबद्ध नियोजन इत्यादी गोष्टींचा विचार केलेला असतो.
(४) भारत स्वतंत्र झाल्यावर आर्थिक विकास साधण्यासाठी भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचाच स्वीकार केला.

**(२) वीस कलमी कार्यक्रम.**

**उत्तर:** भारताला विकसित राष्ट्र बनवावे, या हेतूने प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी १ जुलै १९७५ रोजी 'वीस कलमी कार्यक्रमा'ची घोषणा केली. या कार्यक्रमातील काही प्रमुख कार्यक्रम पुढीलप्रमाणे :
(१) शेतमजुरांना किमान वेतन देणे व जलसंधारण योजनात वाढ करणे.
(२) कामगारांचा उद्योगक्षेत्रात सहभाग, राष्ट्रीय प्रशिक्षण योजना आणि वेठबिगार मुक्ती.
(३) करचुकवेगिरी, आर्थिक गुन्हे व तस्करी रोखणे.
(४) जीवनावश्यक वस्तूंचे दरनियंत्रण, रेशनिंग व्यवस्थेत सुधारणा करणे.
(५) घरबांधणी, दळणवळण सुविधा, शाळांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.

**३. (अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

**(१) स्वतंत्र भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.**

**उत्तर:** (१) मिश्र अर्थव्यवस्थेत भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थांतील चांगले गुण एकत्रित आलेले असतात.
(२) या अर्थव्यवस्थेत देशहिताला प्राधान्य देण्याची वृत्ती असते; तसेच दीर्घकालीन विकासावर अधिक भर दिलेला असतो.
(३) मोठी गुंतवणूक करून उदयोग सुरू करण्यास उदयोजक पुढे येत नाहीत, तेथे सरकारलाच पुढाकार घ्यावा लागतो. म्हणून सरकारला आणि खाजगी उद्योजकांना उद्योग सुरू करता
येईल, अशा मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार स्वतंत्र भारताने केला.

**(२) १९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.**

**उत्तर:** (१) राष्ट्रीयीकरणानंतर बँकांना मिळणारा नफा सरकारी खजिन्यात जमा होणार होता, त्यामुळे योजना राबवताना तूट निर्माण झाली तर ती भरून काढता येणार होती.
(२) लघू व मध्यम उद्योगांचे विकास धोरण राबवणे आवश्यक होते.
(३) लालबहादूर शास्त्रींनी अन्नधान्य टंचाई व दुष्काळ यांवर मात करण्यासाठी हरितक्रांतीचा प्रयोग हाती घेतला होता.
(४) काँग्रेसमधील अनेक नेते व 'काँग्रेस फोरम फॉर सोशलिस्ट ॲक्शन' गटाचे नेते बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी करीत होते. म्हणून १९ जुलै १९६९ रोजी १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

**(३) मुंबईतील गिरणी कामगार संपावर गेले.**

**उत्तर:** (१) काही उद्योगांत कामगारांचे पगार, बोनस व इतर सुविधा जास्त असल्याने गिरणी कामगारांत असंतोष वाढत होता.
(२) १९८१ च्या दिवाळीत कामगारांना २०% बोनसची अपेक्षा होती. कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राष्ट्रीय मिल मजदूर संघाने मालक वर्गाशी वाटाघाटी करून कामगारांना विश्वासात न घेता ८% ते १७% रकमेवर तडजोड केली.
(३) बोनसमधील ही कपात अनेकांना आवडली नाही, त्यामुळे मोठा असंतोष निर्माण झाला.
(४) गिरणी कामगार डॉ. सामंतांकडे गेले. ६५ गिरण्यांमधील कामगार एकत्र येऊन १८ जानेवारी १९८२ रोजी मुंबईतील अडीच लाख गिरणी कामगार संपावर गेले.

**(ब) पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**
**(१) आठव्या पंचवार्षिक योजनेत कोणते कार्यक्रम सुरू करण्यात आले?**

**उत्तर:** आठव्या पंचवार्षिक योजनेत पुढील कार्यक्रम सुरू करण्यात आले
(१) प्रधानमंत्री रोजगार योजना.
(२) महिला समृद्धी योजना.
(३) इंदिरा महिला योजना.
(४) गंगा कल्याण योजना.
(५) मध्यान्ह आहार योजना.
(६) राष्ट्रीय सामाजिक, आर्थिक साहाय्य योजना.

**(२) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत कोणते प्रकल्प सुरू करण्यात आले?**

**उत्तर :** दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत पुढील प्रकल्प सुरू करण्यात आले
(१) दुर्गापूर, भिलाई व राऊरकेला येथील पोलादाचे कारखाने.
(२) सिंद्री येथील रासायनिक खतांचा कारखाना.
(३) चित्तरंजन येथील रेल्वे इंजिनाचा कारखाना.
(४) पेरांबूर येथील आगगाडीच्या डब्यांचा कारखाना.

(५) विशाखापट्टणमचा जहाज बांधणीचा कारखाना.
(६) भाक्रा-नांगल, दामोदर यांसारखी प्रचंड धरणे.